ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# महिला आणि स्वयंरोजगार संधी

**डॉ. निलिमा दिगांबर कापसे**
मराठी विभाागप्रमुख,
विदर्भ महाविद्यालय, लाखनी, जि. भंडारा ( म.रा. )

**सारांशः**
*मानव इतिहासाच्या सुरवातीपासुनच पुरुषप्रधान संस्कृतीमुळे समाज घटकाचा अर्धा हिस्सा असलेल्या महिला वर्गाला अंनत अडचणी, समस्या, अन्यायाला सामोरे जावे लागले. मात्र आधुनिक काळात शिक्षणाचा झालेला प्रसार, सामाजिक ढाच्यात परिस्थितीनुरुप झालेले बदल यामुळे महिला वर्गाला प्रगतीची दारे खुली झाली त्यातुन महिला वर्गाने सर्व क्षेत्रात गगनभरारी सुध्दा घेतली.या क्रांतीची सुरवात ''स्वयंरोजगार'' या शास्त्राने झाली. त्याच्याच बळावर महिला वर्गाला प्रगती साधता आल्याने महिलांना असलेल्या संधीबाबत या लेखात नोंद घेण्यात आली आहे.*

**प्रस्तावना :—**

जगातील एकुण लोकसंख्येचा विचार केल्यास त्यातील अर्धा वाटा महिलांचा आहे. मात्र सर्व क्षेत्रात पुरुषांनाच प्रामुख्याने अग्रक्रम देण्याची पुरुषप्रधान समाजव्यवस्था निर्माण झाली. यामुळे महिला वर्गाकडे पाहण्याचा दृश्टिकोन 'संकुचित' बनला. याचा परिणाम सर्व महिला वर्गाला भोगावा लागला असुन त्यामुळे महिला वर्गाची स्वतःकडे पाहण्याची दृष्टीही संकुचित बनत गेली. याचा दिर्घ परिणाम असा झाला की, महिलांमधील असलेला आत्मविश्वास महिला गमावुन बसल्या. महिलांकडे असलेली बुध्दीमत्ता, कौशल्य पार लयाला जाउन महिला ''आश्रित'' जिवन जगु लागल्या. कधी वडिलांवर कधी पतिवर, कधी मुलावर अवलंबुन राहु लागल्या. महिलांच्या वाटयाला सातत्याने ''आश्रित'' पणा आल्याने त्यांचे समाजातील स्थानच नगण्यस्वरुपाचे बनले. यामुळे त्यांच्या आयुष्याला कायम दुःखाचे ग्रहण लागले. जगातील सर्व देशांमध्ये ही परिस्थिती आढळुन येते याला अपवाद कुठेही नाही त्यामुळे जगातील महिला वर्ग हा प्रभावित झाला आहे. विसाव्या शतकाच्या मध्यापासुन मात्र यात बदलाची वारे वाहु लागली आणि त्याचा वेग पाहु जाता सर्व क्षेत्र महिला काबीज करण्यास सज्ज झालेल्या आहेत. याकरिता महिलांमध्ये असलेली पारंपारिक ''आश्रित'' असण्याची भावना दुर होउन आत्मविश्वास जागृत होण्याची प्रक्रिया झपाटयाने दृढ होत आहे. या आश्रितेच्या दृढ चक्रातुन महिला वर्ग बाहेर पडत असुन आधुनिक युगातील सर्वागीन क्षेत्रे काबीज करण्यास निघाला असुन त्याकरिता स्वयंमरोजगाराचे अजेय शास्त्र महिलांनी हाती घेतले आहे. स्वयंमरोजगाराच्या अस्त्रानेच सर्व क्षेत्र पदाक्रांत करण्यास महिला वर्ग पुढे सरसावला आहे.

**महिला आणि स्वयंरोजगाराच्या संधी**

आधुनिक युग हे स्पर्धेचे युग असुन या स्पर्धेत टिकण्यासाठी आवश्यक असणारी जिद्द, चिकाटी, धैर्य, निर्णयक्षमता, धडाडी, मुत्सद्दीपणा, समजुतदारपणा (Devotions & Passions) हे सर्व गुण महिलांमध्ये ठासुन भरलेले असल्याने ''लाथ मारीन तेथे पाणी काढीन'' या उक्तीप्रमाणे महिलांनी आता या स्पर्धेच्या युगात उडी घेतलेली आहे. राजकीय, आर्थिक, सामाजिक, वैज्ञानिक, तांत्रीक, संगणकशास्त्र, क्रिडा, सांस्कृतिक, प्रशासकीय, पर्यटन, सेवाक्षेत्र, उद्योग अश्या सर्वच क्षेत्रात जी गरुडझेप महिला वर्गाने घेतली आहे त्याची तोड नाही. एकंदरीत यशस्वीतेचा जो राजपथ महिलांना उपलब्ध झालेला आहे त्या राजपथाची पहिली पायरी म्हणजे ''स्वयंरोजगार''.

आज अनेक क्षेत्रात महिला उद्योजक कार्यरत आहेत उदा. किरण मुजुमदार, शोभना भारीत, विद्या वेंकटरामण, अनमिका सेनगुप्ता, शीला बजाज, युक्ती नागपाल, गौतमी बलराज आदी. क्रिडा क्षेत्रात ज्यांनी आपली छाप सोडली आहे अश्या पी. टी. उषा, सायना नेहवाल रीता सिंधु, हीमा दास, दुती चांद, गीता फोगाट, विनेश फोगाट, दिपिका कुमारी, मेरी कोम, सानिया मिर्झा, मिथाली कौर, मिथाली राज इ. ऑलंम्पिक स्पर्धेत पदक मिळविणाऱ्या पी. व्ही. सिंधु, कर्नम मल्ले वरी, मेरी कोम इ. राजकीय क्षेत्रात ज्यांनी आपली कारकिर्द गाजविली अश्या भारताच्या पहिल्या पंतप्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी, भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील, विरोधी पक्षनेत्या राहिलेल्या सुषमा स्वराज, भारतातील सर्वात जुना असलेल्या कॉग्रेस पक्षाच्या अध्यक्ष श्रीमती सोनिया गांधी, अंतराळ क्षेत्रात अजरामर असलेली कल्पना चावला अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. एकंदरित सर्वच क्षेत्र पदाक्रांत करणाऱ्या महिलांमधील आत्मविश्वास जागृत करण्याचे आणि वृदधींगत करण्याचे श्रेय व गुपीत हे ''स्वयंरोजगार'' यात दडलेले आहे.

''स्वयंरोजगारातुन विकास'' हे सर्वांगीन प्रगतीचे इंगित महिलांना लक्षात आले असल्याने अनेक महिलांनी

''स्वयंमरोजगाराची कास'' धरलेली आहे. आज अनेक क्षेत्र महिलांच्या कर्तत्वाला खुणावत असुन त्याव्दारे महिलांना आपला व्यक्तिमत्वाचा विकास तर घडवुन आणता येईलच सोबतच त्यांना आपल्या कुटुंबाचा प्रमुख आधार होता येईल.''स्वयंरोजगार'' साठी महिलांना उपलब्ध असलेले सर्वात मोठे क्षेत्र म्हणजे ''सेवाक्षेत्र'' सेवाक्षेत्राची व्याप्ती अतिशय मोठी असुन आज सेवाक्षेत्राने सर्व क्षेत्र आपल्या परिघात सामावुन घेतलेली आहेत. आता प्रशासकीय कामकाजातही सेवाक्षेत्राकडुन सेवा घेवुन कामकाज करवुन घेतले जाते त्याकरिता Outsourcing हा फॅक्टर महत्वाचा ठरत आहे. प्रशासकीय अनेक जबाबदाऱ्या, कार्य हे या माध्यमातुन करवुन घेतल्या जातात. वेगवेगळी अहवाल तयार करणे, अहवालासाठी आवश्यक माहिती गोळा करणे, गरजुंची यादी तयार करणे, गरजुंना आवश्यक असणाऱ्या सोयीसुविधांचा अहवाल मागविणे, मदत पुरवितांना प्रत्यक्ष सेवाक्षेत्राची मदत घेणे, भाासकीय, निमशासकीय कार्य सेवाक्षेत्राव्दारे पार पाडणे इ. विद्यापीठ स्तरावरही या सेवाक्षेत्रांची मदत घेवुन कार्य केले जाते उदा. परिक्षांचे आयोजन, निकालपत्रके तयार करणे, परिक्षेशी संबंधित साहित्य परिक्षाकेंद्रावर पोहचवणे इ. निवडणूक आयोगाकडुनही निवडणूकीच्या वेळी निवडणूक साहित्याची जुळवाजुळव ही सेवाक्षेत्राच्या माध्यमातुनच केली जाते. राजकारणातही सेवाक्षेत्राचा उपयोग मोठया खुबीने घेतला जातो, मतदारसंघाचा मतदारांचा सर्वकंष अभ्यास अहवाल तयार करणे, मतदारसंघातील मतदारांच्या अपेक्षा जाणुन घेणे, कोणता उमेदवार निवडणूक जिंकु शकतो याचा अहवाल तयार करणे, निवडणुकीत कोणते विषय, मुद्दे प्रचारात घेतले पाहिजे, कोणते मुद्दांना बगल दिली पाहिजे हे सर्व सेवाक्षेत्राकडुन घेतलेल्या अहवालावरुन ठरविले जाते. पर्यटन क्षेत्रात तर अमर्याद संधी उपलब्ध आहेत. परिवहन सेवा क्षेत्रातही अमर्याद संधी उपलब्ध आहेत. कॅटरिंगच्या सेवाक्षेत्रातही अमर्याद संधी उपलब्ध आहेत. क्रिडा क्षेत्र आणि वृत्तपत्रीय क्षेत्र (Print Media) दुरचित्रवाणी TV Medi शिवाय चित्रपट क्षेत्र, जाहितात क्षेत्र, आरोग्य सेवा, शिक्षण सेवा या सर्व सेवाक्षेत्रात प्रामुख्याने महिला आपल्या सेवा देउन स्वयंमरोजगार निर्मिती करित आहेत.आता तर सरंक्षण क्षेत्रातही महिलांकरिता सेवा संधी उपलब्ध झालेली आहे. यासर्व संधीचे सोने करुन महिला आपला, आपल्या कुटुंबाचा पर्यायाने देशाचा विकास घडवुन आणतील यात शंका नाही.

**निष्कर्ष** –

महिला वर्गाने त्यांच्यावर पुर्वापार होत आलेला अन्याय दुर करण्यास प्रारंभ केलेला असुन शिक्षण, क्रिडा, राजकारण, अर्थकारण, समाजकारण, विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ या सर्व क्षेत्राला गवसणी घालुन गरुडझेप घेतलेली आहे. परंपरेने त्यांना असलेल्या बंधनांच्या बेडया तोडलेल्या असुन आतापर्यंत पुरुषांना खुल्या असलेली क्षेत्रे काबीज करण्यास सुरवात केलेली असुन प्रत्येक क्षेत्रात नेत्रदिपक अशी कामगिरी पार पाडत आहेत. यासर्व प्रगतीचे मुळ महिलांनी स्वयंरोजगाराची धरलेली कास हे होय. महिलांनी साधलेली प्रगती आणि पदाक्रांत करित असलेली सर्व क्षेत्र यामुळे महिलांमध्ये निर्माण झालेला आत्मविश्वास यामुळे सर्व जगाची प्रगती साधल्या जाणार आहे. आणि आतापर्यंत एकुण लोकसंख्येच्या अर्ध्या असणाऱ्या महिलावर्गाला ज्या प्रगतीपासुन दुर ठेवण्यात आले होते त्या महिला वर्गाला न्याय मिळाला आहे.

**संदर्भ** :–

1. *उद्योजक*
2. *मराठी विश्वकोष*
3. *वृत्तपत्रीय लेख*
4. *वेब माहिती*